नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे
YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - २९१ Issue - 291 | वार रविवार दि. ९ मार्च २०२५ Blow- Sunday Date 9 March 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com




## ‘विकसित भारत २०४७’साठी महिलांचा सहभाग महत्त्वाचा : मुख्यमंत्री फडणवीस

### छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र असलेल्या ‘रूपे कार्ड’चे अनावरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्र आणि राज्य शासनाच्या आर्थिक सहाय्याच्या योजनांमुळे बचत गटाच्या माध्यमातून महिला उद्यमशील बनत आ-हेत. यामुळे ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था अधिक बळकट होत असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी केले.

जागतिक महिला दिनानिमित्त महिला व बालविकास विभागामार्फत ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ राज्यस्तरीय समारोप व कन्यारत्न यांचा सन्मान कार्यक्रमाचे आयोजन राजभवन येथे करण्यात आले होते त्यावेळी राज्यपाल बोलत होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागाचे सचिव डॉ. अन-ुपकुमार यादव, विभागाचे आयुक्त नयना गुंडे, एकात्मिक बाल विकास सेवा योजनेचे आयुक्त कैलास पगारे, महिला स्वयंसहाय्यता गटाच्या सदस्य आदी उपस्थित होते.

राज्यपाल म्हणाले की, कुटुंबासह देशाच्या विकासासाठी महिलांचे योगदान महत्त्वाचे आहे. आज सन्मानित करण्यात आलेल्या महिला विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करीत आहेत. प्रधानमंत्री यांच्या निर्णयानुसार संरक्षण विभागाच्या तिन्ही दलांमध्ये महिलांना काम करण्याची संधी दिली आहे आणि तिथेही त्यांनी आपले अस्तित्व सिद्ध केले आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणा-ले की, महिलांच्या योगदानाशिवाय देशाचा विकास होणे शक्य नाही. २०२९ पर्यंत राजकीय क्षेत्रात मि ळणाऱ्या आरक्षणामुळे महाराष्ट्र हे ‘महिला राज्य’ होणार आहे. २०४७ मध्ये विकसित भारताचे उद्दिष्ट पूर्ण करताना महिलांचा सहभाग हा म हत्त्वाचा ठरणार आहे.

सामाजिक बंधनातून खडतर प्रवास करणाऱ्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले आणि ज्योतिबा फ ुले यांनी महिलांसाठी शिक्षणाची दारे खुली केली, विधवा पुनर्विवाह सुरू केले आणि महिलांसाठी केशवपन प्रथा बंद केली.

पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर उत्तम प्रशासक होत्या. छत्रपती शिव-ाजी महाराज घडविणाऱ्या राजमाता जिजाऊ होत्या अशा शक्तिरुपी स्त्रियांचा विचार आणि आदर्श घेऊन काम केल्यास प्रगती साध्य करता येईल.

लोकसंख्येत ५० टक्के महिला असून, महिलांना केंद्रस्थानी ठेवून मानव संसाधन विकसित केल्यास देश विकसित होईल हे प्रधानमंत्री श्री. मोदी यांनी ओळखले आणि म्हणूनच ‘लेक लाडकी’ ते ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’, ‘लखपती दीदी पर्यंत योजना सुरू करून त्या प्रभावीपणे राबविल्या जात आहेत. ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ या योजनेमुळे राज्यातील अनेक जिल्ह्यातील बालविवाह बंद झाले आहेत आणि लिंगभेदाचे, भ्रूणहत्येचे प्रमाण कमी झाले आहे.

> **महिला बचत गटाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेचे बळकटीकरण : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन**

मुख्यमंत्री म्हणाले की ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेच्या लाभार्थी महिलांनी सुरू केलेल्या क्रेडिट सोसायटीचा विस्तार वाढवून उद्योगात आपले अस्तित्व मजबूत करायचे आहे असे सांगून मुख्यमंत्री यांनी महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**महिलांचा प्रशासकीय सहभाग वाढविण्यासाठी विशेष ग्रामसभा**

मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, ‘बेटी बचाओ बेटी पढाओ’ या उपक्रमाला दहा वर्ष पूर्ण होत आहेत. मुलींचा जन्मदर वाढावा तसेच महिलांच्या शिक्षणातून त्यांचे सक्षमीकरण व्हावे यासाठी प्रधानमंत्री यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम सुरू करण्यात आला होता. ही योजना यशस्वीपणे राबविण्यात महाराष्ट्र हे अव्वल राज्य ठरले आहे, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले. महिलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आणि त्यांचा प्रशासकीय सहभाग वाढविण्यासाठी महिला दिनानिमित्त आज राज्यभर विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात आल्या असून, यापुढेही त्याचे आयोजन करण्यात येईल. उच्च शिक्षणात मुलींची टक्केवारी वाढविण्याच्या उद्देशाने विभाग काम करीत असून, शिक्षण क्षेत्रात मुलींची संख्या वाढविण्यात राज्य आघाडीवर असेल, असा विश्वास मंत्री तटकरे यांनी व्यक्त केला. आरोग्य, उद्य-ोग, आर्थिक , सामाजिक क्षेत्रात महिलांची प्रगती व्हावी यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**लाडक्या बहिणीसाठी राज्यस्तरीय क्रेडिट संस्था स्थापणार**

महिलांचे शिक्षण व समाजा-तील स्थान सुधारणे यासाठी ‘लेक लाडकी’, ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ यासारख्या सक्षमीकरणासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविल्या जात असल्याचे सचिव डॉ. अनुपकुम ार यादव यांनी सांगितले. नागपूरच्या लाडक्या बहिणींनी नागपूर महिला सन्मान क्रेडिट सोसायटी सुरू केली, ज्याच्या माध्यमातून या महिला उद्य-ोग सुरू करीत आहेत आणि इतर महिलांनाही सहकार्य करीत आहेत. म हिला आर्थिक विकास महामंडळाच्या साहाय्याने राज्यस्तरीय क्रेडिट सोसायटी स्थापन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे छायाचित्र असलेल्या ‘रूपे कार्ड’चे अनावरण**

छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेले ‘रूपे कार्ड’ ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण’ योजनेच्या लाभार्थ्यांना देण्यात येणार आहे. मल्टि मोडल ट्रान्सपोर्ट एक्सेस त्यात उपलब्ध आहे. याद्वारे डिजिटल सुरक्षितता आणि इन्शुरन्ससुद्धा मिळणार आहे. तसेच पेमेंट करण्यासाठी क्यूआर कोडही देण्यात आला आहे. या कार्डचे यावेळी अनावरण करण्यात आले. देशात ‘रूपे कार्ड’ देणारे महाराष्ट्र पहिले राज्य आहे.

## भारत आयातशुल्क कपातीला तयार, ट्रम्प यांच्या दाव्यावरून वाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : अमेरिकी मालावर प्रचंड आयातशुल्क लादणाऱ्या भारताने आपले कर मोठ्या प्रमाणात कमी करण्याचे मान्य केले आहे असा दावा अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शुक्रवारी केला. त्यांच्या यासंबंधी वक्तव्यानंतर भारतामध्ये राजकीय वाद उद्भवला आहे.

ट्रम्प ओव्हल कार्यालयातून यासंबंधी बोलताना म्हणाले की, जगातील भारत आम च्याकडून प्रचंड शुल्क आकारतो. पण आता आम्ही त्यांचे धोरण उघड केल्यामुळे अखे-रीस त्यांनी त्यांचे आयातशुल्क मोठ्या प्रमाणात कमी करण्याचे मान्य केले आहे. वाणिज्यमंत्री पीयूष गोयल व्यापारावर चर्चा करण्यासाठी वॉशिंग्टनमध्ये असतानाच ट्रम्प यांनी याप्रकारे दावा केल्यामुळे वाद निर्माण झाला आहे.

दरम्यान, ट्रम्प यांनी दावा केल्याप्रमाणे सरकारने खरोखर आयातशुल्क कमी करण्याचा निर्णय घेतला आहे का असा प्रश्न काँग्रेस पक्षाने शनिवारी केंद्र सरकारला विचारला. या मुद्द्यावर संसदेला विश्वासात घेतले जावे असे आ-वाहन काँग्रेसने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना केले.

अमेरिकेच्या दबावासमोर झुकून आणि आयातशुल्क कमी करून मोदी सरकारने भारतीय शेतकरी तसेच सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांचे हितसंबंध सोडून दिले आ-हेत का असा प्रश्न काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी एक्स’वर पोस्ट लिहून विचारला.

भारत आमच्यावर प्रचंड आयातशुल्क लावतो. पण आता त्यांना अखेरीस हे लक्षात आले आहे की कोणीतरी त्यांचे धोरण उघड करत आहे. त्यामुळे त्यांनी आयातशुल्क भरपूर कमी करण्याचे मान्य केले आहे, असे अमेरिका अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सांगितले.

## मणिपूरमध्ये संघर्षात एक ठार, केंद्र सरकारच्या निर्देशांविरोधात कुकींची निदर्शने; २५ जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इम्फाळ : मणिपूरच्या कांगपोकपी जिल्ह्यामध्ये कुकी निदर्शक आणि सुरक्षा दलांमध्ये शनिवारी संघर्ष झाल्यामुळे पुन्हा अशांतता निर्माण झाली. या संघर्षामध्ये एक व्यक्ती ठार झाली असून २५ जण जखमी झाले. मृत व्यक्तीची ओळख पटली असून त्याचे नाव लालगौथासिंह सिंगसिट असे असल्याची माहिती देण्यात आली. जखमींमध्ये काही महिलांचाही समावेश असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिलेल्या राज्यभरात मुक्त हालचाली निर्दे शांना विरोध करण्यासाठी कुकी गटाने निदर्शने केली. त्यांना पांगवण्यासाठी पोलिसांनी अश्रधुराच्या नळकांड्या फोडल्या. मैतेईंच्या ‘फेडरेशन ऑफ सिव्हिल सोसायटी’ने (एफओसीएस)




या संघटनेने काढलेल्या शांतता मोर्चाला विरोध करणे हाही कुकींच्या निदर्शनांचा हेतू होता. निदर्शकांनी खासगी वाहने पेटवून दिली आणि इम्फाळहून सेनापती जिल्ह्याकडे जाणारी राज्य परिवहन महामंडळाची बस थांबवण्याचा प्रयत्न केला, त्यानंतर परिस्थिती चिघळ-ली. निदर्शकांनी एनएच-२ हा (इम्फाळ-दिमापूर) राष्ट्रीय महामार्गही बंद करण्याचा प्रयत्न केला आणि सरकारी वाहनांच्या वाहतुकीत अडथळे आणण्यासाठी रस्त्यावर टायर जाळले.

मैतेईंच्या शांतता मोर्चाम ध्ये १०पेक्षा जास्त वाहनांचा समावेश होता. तो कांगपोकपी जिल्ह्यात पोहोचण्यापूर्वीच सुरक्षा दलांनी सेकामी येथे अडवला. मोर्चा काढण्यासाठी परवानगी नसल्यामुळे तो थांबवण्याचे निर्देश होते असे पोलिसांकडून सांगण्यात आले. मात्र, आपण केवळ मुक्त हालचाल निर्देशांचे पालन करत होतो असे मोर्चेकऱ्यांचे म्हणणे होते.

## हम्पी येथे इस्त्रायली पर्यटक महिलेसह दोघींवर सामूहिक बलात्कार, २ आरोपींना अटक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बंगळुरू : कर्नाटक येथील हम्पीमध्ये इस्त्रायली पर्यटक महिलेसह दोन महिलांवर बलात्कार झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या घटनेनंतर कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी शनिवारी हम्पी बलात्कार घटना ही घृणास्पद गुन्हा असल्याचे म्हटले आहे. तसेच त्यांनी या प्रकरणातील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून पुढील तपास सुरू असल्याचे म्हटले आहे. मला घटनेची माहिती मिळताच संबंधित पोलीस अधिकार्यांना तात्काळ कारवाई करण्याचे, तसेच काटेकोर तपास करून आरोपींना ताबडतोब ताब्यात घेण्याचे आदेश दिले. पोलिसांनी दोन आरोपींना अटक केली आहे आणि पुढील तपास सुरू आहे, असे सिद्धरामय्या यांनी एक्सवर केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे. दरम्यान कर्नाटकचे उपमुख्यमंत्री डीके (पान २ वर...)



**५१०० कोटी रुपयांची तरतूद** | **योजनेचे निकष होणार लवकरच जारी**

## दिल्लीत महिलांना दरमहा मिळणार २५०० रुपये! महिला समृद्धी योजनेला सरकारची मंजुरी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



दिल्ली : दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी भारतीय जनता पक्षाने दिलेले आश्वासन पूर्ण केले आहे. दिल्ली शरकारने महिला समृद्धी योजनेला मंजुरी दिली आहे. या योजनेअंतर्गत पात्र लाभार्थ्यांना महिन्याला २५०० रूपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी शनिवारी याबद्दलची घोषणा केली आहे.

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित भाजपा महिला मोर्चाच्या अधिवेशनाच्या समारोपावेळी बोलताना गुप्ता यांनी याबद्दल माहिती दिली आहे. महिला दिनाचे पार्श्वभूम ीवर दिल्ली मंत्रिमंडळाची बैठक बोलावण्यात आली आणि महिला समृद्धी योजनेअंतर्गत आमच्या जाहिरनाम्यात दिल्लीच्या महिलांना दिलेले वचन पूर्ण केले असे रेखा गुप्ता यांनी सांगितले. आम्ही दिल्लीतील गरीब बहिणींना दरमहा २५०० रुपये मिळतील असे आश्वासन दिले होते. आज आम्ही यावर शिक्कामोर्तब केले आहे. आम्ही या योजनेला मान्यता दिली आहे आणि या आर्थिक वर्षासाठी अर्थसंकल्पात ५१०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे, जेणेकरून आम्हाला योजनेअंतर्गत लाभ देण्यास सुरुवात करता येईल, असे रेखा गुप्ता पुढे बोलताना म्हणाल्या.

ही योजना लागू करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे असेही गुप्ता यांनी सांगितले. या समितीमध्ये अशिष सूद परवेश वर्मा आणि कपिल मिश्रा या कॅबिनेट मंत्र्यांचा देखील सम ावेश असणार आहे. तसेच त्यांनी लवकरच योजनेच्या नोंदणीसाठी पोर्टल आणि योजनेचे निकष देखील लवकरच जारी केले जातील असेही यावेळी सांगितले.

## पुण्यात भर चौकात अश्लील चाळे करणाऱ्या गौरव अहुजाचा माज उतरला, मागितली माफी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुण्यात भर चौकात अश्लील चाळे करणारा गौरव अहुजा याचा अखेर माज उतरला आहे. पोलीस आज सकाळपासून त्याचा शोध घेत होते. अखेर तो पोलिसांच्या हाती लागला आहे. पोलिसांनी आरोपी गौरव अहुजा याला अटक केली आहे. यानंतर गौरव अहुजा याच्या माफी मागताना-चा व्हिडीओ समोर आला आहे. गौरव अहुजा पुण्यातून बाहेर पळून गेला होता. पण पोलिसांनी त्याला आता ताब्यात घेतलं आहे. त्याला लवकर जवळच्या पोलीस ठाण्यात हजर केलं जाईल. त्यानंतर त्याला पुण्याला नेण्यात येईल. त्यानंतर त्याला उद्या कोर्टात हजर केलं जाणार आहे.

मी गौरव अहुजा. राहणार पुणे. म ाझ्याकडून काल पब्लिकमध्ये जे कृत्य झालं होतं ते खूप चुकीचं होतं. मी मना-पासून माफी मागतो. मी संपूर्ण जनता, पो-लीस आणि शिंदे साहेबांची माफी मागतो. मला माफ करा आणि मला एक संधी द्या. सॉरी, असं गौरव अहुजा व्हिडीओत बोल-ताना दिसत आहे. ’एबीपी माझा’ने गौरव अहुजाचा माफी मागतानाचा व्हिडीओ समोर आणला आहे.

गौरव अहुजा याने केलेल्या अश्लील कृत्यामुळे पुण्यासह राज्यात संतापाची लाट उसळली आहे. विशेष म्हणजे आता गौरव अहुजा याची कुंडलीच समोर येत आहे. या गौरव अहुजाने याआधीही जेलवारी केल्याची माहिती समोर येत आहे. गौरव अहुजावर जुगाराचा आणि खंडणीचा गुन्हा दाखल आहे. पुण्यातील नामचीन गुंड सचिन पोटो याच्यासोबत हा गौरव अहुजा काम करतो. सचिन पोटे, गौरव अहुजा, सुनील मखेजा आणि अजय शिंदे यांना २०२१ मध्ये अटक करण्यात आली होती. या चौघांनी एक रॅकेट चालवलं होतं.

आरोपी क्रिकेट सामन्यांचे बेटिंग करायचे. यामध्ये ते तरुणांना अडकवायचे. यातून त्यांनी अनेक तरुणांना कर्जबाजारी केलं होतं. त्यानंतर या आरोपींनी तरुणांना आपल्या स्वत:च्या घरात पैसे चुकवण्यासाठी चोरी करायला भाग पाडलं होतं. कॉलेजम धील एक विद्यार्थी तक्रारीसाठी पुढे आला आणि त्याचा प्रकार समोर आला होता. पोलिसांनी चारही आरोपींना अटक केली होती.

# कमलाकार सोनकांबळे यांची आयटीआयच्या व्यवस्थापन समितीच्या शासकीय सदस्यपदी निवड



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

अक्कलकोट/प्रतिनिधी : गोगांवचे उपसरपंच कमलाकार सोनकांबळे यांची श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटी आय)येथे व्यवस्थापन समितीवर शासकीय सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे.

कमलाकार सोनकांबळे हे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांचे खंदे समर्थक असुन म.रा.मराठी पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष आहेत.सिद्धार्थ सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून युवकांसाठी विविध रोजगार निर्मिती बाबत उपक्रम राबविले,सम्यक उद्योग समूहाच्या माध्यमातून युवकांना व्यवसाय करण्यासाठी शासकीय योजनेचे माहिती देण्याचे काम केले आहे. सामाजिक कार्य करत असताना युवकांनी व्यवसायाकडे वळले पाहिजे यासाठी ते सतत प्रयत्नशिल असतात. या सर्व कामाची दखल घेऊन

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेवर व्यवस्थापन समिती सदस्य म्हणून निवड करण्यात आली आहे

कमलाकर सोनकांबळे यांच्या निवडी बददल आ. सचिन कल्याणशेट्टी, नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, सागर कल्याणशेट्टी, संतोष गायकवाड,गोगावच्या लोकप्रिय सरपंच वनिता मधुकर सुरवसे, युवा उद्योजक मधुकर सुरवसे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस विश्वासराव अरोटे, प्रसिद्धी प्रमुख नवनाथ जाधव,रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गटाचे तालुकाध्यक्ष अविनाश मंडीखांबे, सरपंच संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रदीप जगताप, एस एस शेळके प्रशाला व ज्युनियर कॉलेजचे चेअरमन बसवराज शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्य आनंद तानवडे, सोलापूर जिल्ह्यातील वरिष्ठ पत्रकार आणि सुयश मीडियाचे ब्युरो चिफ महेश गायकवाड यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहे.

**अक्कलकोट तालुक्यातील ग्रामीण भागातील ज्या विद्यार्थ्यांना चांगले काम करता येतील ते सर्व कामे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली केले जातील.औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात नव्याने काय करता येईल याकडे लक्ष दिले जाईल व आपल्या तालुक्यातील जास्ती जास्त विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन व्यवसाय करतील याकडे लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.**

**– कमलाकर सोनकांबळे**
अध्यक्ष म.रा.पत्रकार संघ,
उपसरपंच गोगाव, अक्कलकोट

## हम्पी येथे इस्त्रायली पर्यटक महिलेसह दोघींवर सामूहिक बलात्कार, २ आरोपींना अटक




(पान १ वशिवकुमार यांनी देखील आरोपींवर कायद्याच्या चौकटीत कठोरात कठोर कारवाई केली जाईल असे आश्वासन दिले आहे. पोलीस घटनेचा तपास करत असल्याचेही शिवकुमार म्हणाले.

ते म्हणाले की, मला या बद्दल काल माहिती मिळाली. दोन जणांना अटक करण्यात आले आहे आणि एक जण फरार आहे. ते मध्यरात्री तारे बघण्यासाठी तेथे गेले होते. पोलीस घटनेचा तपास करत आहेत. कायद्यानुसार आम्ही कारवाई करू. कोप्पल पोलिसांनी शनिवारी दिलेल्या माहितीनुसार, कर्नाटकमधील विजयनगर जिल्ह्यात हंपी वारसा स्थळाजवळ ६ मार्चच्या रात्री तीन पुरूषांनी एका इस्त्रायली महिलेसह दोन महिलांवर सामूहिक बलात्कार केला. तसेच या महिलांबरोबर असलेला एक पुरूष पर्यटक मृत अवस्थेत आढळला आहे.

## पडघा येथे मराठी भाषा गौरव दिन साजरा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : श्री शारदा अक्ॅडमी पडघे यांच्या वतीने संस्थापक अध्यक्ष व सल्लागार शंशाक तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त भिवंडी तालुक्यातील पडघा जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख म्हणून शिंदे गटाचे शिवसेना नेते प्रकाश पाटील , शिवसेना उबाठा गटाचे उपनेते विश्वास थळे, पडघा ग्रामपंचातीचे सरपंच रवींद्र विशे, उपसरपंच निता दास ,माजी सरपंच प्रभावती जाधव ,माजी उपसभापती गुरुनाथ जाधव, वृषाली विशे , डॉ संजय पाटील उपस्थित होते. मराठी भाषेचं संवर्धन करण्यासाठी आपण सर्वांनी एक होऊन त्यासाठी प्रयत्न केले पाहजेत.असे यावेळी श्री शारदा अक्ॅडमीचे अध्यक्ष प्रशांत तांबोळी यांनी प्रास्ताविकेत मांडले. यावेळी श्री शारदा अँकेडमी करीत असलेल्या उपक्रमाचे कौतुक करून सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे प्रकाश पाटील यांनी आपल्या भाषणात सांगुन शारदा ॲकेडमीच्या पदाधिकारी, सदस्यांना शुभेच्छा दिल्या. प्रकाश पाटील व विश्वास थळे यांच्या हस्ते शारदा अँकेडमीच्या यु. ट्युब चॅनेलचे उद्घाटन करण्यात आले. तसेच पत्रकार, मुख्याध्यापक, शिक्षक, चित्रकार, रांगोळी रेखाटणारे कलाकार, सेवानिवृत्त शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांचा शाल, पुष्पगुच्छ, तुळशीचे रोप, सन्मानचिन्ह, देऊन गौरव करण्यात आला. यावेळी विजयकुमार भोईर, जगदेव भट्ट, नवनाथ रणखांबे ड.प्रज्ञेश सोनावणे, संदीप कांबळे, मिलिंद जाधव, संघरत्न घनघाव, अक्षय भोईर, ज्योती घनघाव, अनिल शेलार, कैलास म्हस्के, भगवान गायकवाड, संजय गायकवाड, शाईस्ता शेख, सायजीन शेख यांनी कविता सादर केल्या. यावेळी श्री शारदा अँकेडमीच्या अध्यक्ष सेजल तांबोळी, उपाध्यक्ष अश्विनी गायकवाड, चिटणीस मयुरी बिडवी, खजिनदार ममता शेलार, कार्याध्यक्ष उषा आगोणे, सदस्य सानीका पारधी, उज्वला जाधव, नितीशा म्हात्रे, चेतना वोळज, टी. ए. पाटील शाळेचे मुख्याध्यापक रामचंद्र थोरात, शिक्षक संजय चौधरी, अनिल शेलार उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमर राऊत यांनी केले.

## श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर जतन व संवर्धन: मंगळवारी बैठकीचे आयोजन

### जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली होणार बैठक



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर व परिवार देवता मंदिर जतन, संवर्धन व जिर्णोद्वाराचे काम शासन निधीतून पुरातत्व विभागामार्फत सुरू आहे. सदर कामाचा आढावा घेण्यासाठी तसेच टोकन दर्शन प्रणाली सुरू करण्याबाबत टिसीएस कंपनीच्या प्रतिनिधी बरोबर चर्चा करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता भक्तनिवास येथे बैठक आयोजित करण्यात आली आहे. सदर बैठकीमध्ये गाभा-यातील दगडी कामास कोटींग करणे व इतर अनुषंगीक कामासाठी श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या दर्शन वेळेत बदल करण्याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी सांगीतले.

या बैठकीस स्थानिक लोकप्रतिनिधी, पोलीस अधिक्षक, मंदिर समिती, सल्लागार परिषद, महाराज मंडळी व स्थानिक प्रशासकीय अधिकारी यांची उपस्थिती राहणार आहे. सदर बैठकीत चर्चा होवून निर्णय घेण्यात येणार आहे. सद्यस्थितीत सुरू असलेल्या श्री विठ्ठल रुक्मिणीमातेच्या दर्शन वेळेत कोणत्याही बदल करण्यात आलेला नाही, याची वारकरी भाविकांनी नोंद घ्यावी असे व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांनी यावेळी सांगीतले आहे.

## महिलांना भयमुक्त, सक्षम व प्रवाशाली बनविण्यासाठी ग्रामपंचायत नारायण चिंचोली येथे विविध उपक्रमाचे आयोजन




दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ८ मार्च २०२५ रोजी पंढरपूर तालुक्यातील नारायण चिंचोली येथे ग्रामपंचायत ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण करणे, अंधश्रद्धा अनिष्ट रूढी परंपरा यातून मुक्तता करणे, बालविवाह रोखणे महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करणे, मुलींचा जन्मदर वाढविण्यासाठी प्रयत्न करणे महिलांचा ताण-तणाव कमी करणे आयुष्यमान वाढवणे यासाठी खेळ गाणी गप्पा चर्चा बोधकथा यांच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात आले.

यावेळी महिलांचे स्वागत केले प्रमुख मान्यवरांच्या हस्ते माता जिजाऊ माता सावित्री माता रमाई, माता अहिल्या यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येऊन या महा न मातांचा गौरवोद्गार करण्यात आला व मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी श्री जन्माचे स्वागत म्हणून मुलींना जन्म देणाऱ्या मातेला बाळाचे संगोपन कीट देऊन सन्मानित करण्यात आली आरोग्य विभागाकडून महिलांच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली यामध्ये शुगर बीपी हिमोग्लोबिन यांच्या तपासण्याही करण्यात आल्या मार्गदर्शन ही करण्यात आले यावेळी तालुका वैद्यकीय अधिकारी एकनाथराव बोधले व त्यांचे सहकारी उपस्थित होते यावेळी शिक्षिका बामणे मॅडम, अर्जुन कारले मस्के , उत्पाद मॅडम मेळा घाडगे अंगणवाडी कार्यकर्ता, शांता बनसोडे अन्नपूर्णा मडकुंबे , उषा कोले सुजाता जाडकर , प्रीतम नलावडे, शितल घाडगे, सीआरपी शोभा आहेर, रूपाली गुंड, त्यांनी मेहनत घेतली.

हा कार्यक्रम उपसरपंच गहिनीनाथ चव्हाण प्रोफेसर दत्तात्रय मस्के सर माननीय इतर सरपंच बलवंत धनवडे, विठ्ठल माने विष्णू माने न्यानेश्वर बर्डे, ग्रामपंचायत सदस्य अलका माने, अमृता गायकवाड, इत्यादी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या परिचय पंचायत समिती अधिकारी संतोष गायकवाड यांनी दिला, व आभार प्रदर्शन हरिदास सर यांनी केले.

# जीवनात यशस्वी होण्यासाठी आई, वडील व गुरुजन यांचा आदर राखावा : पोलीस उप-अधीक्षक राजश्री पाटील

## स्वेरीमध्ये 'जागतिक महिला दिन' साजरा



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : 'महिला दिन' साजरा करताना माँ जिजाऊ, सावित्रीबाई फुले, राहीबाई पोपेरे यांच्या अदभूत कार्याला आपण वंदन केले पाहिजे. एक महिला काय करू शकते, याची प्रचीती त्यांच्या कार्यातून येते. ज्यावेळी मी लहान होते तेव्हा 'कलेक्टर होण्यासाठी काय करावे लागेल' या प्रश्नावर बाबा म्हणाले 'अभ्यास करावा लागतो, वर्गामध्ये पहिला नंबर काढावा लागतो.' बाबांच्या या वाक्याने मी माझे ध्येय तिथेच निश्चित केले आणि त्या दिशेने मार्गक्रमण सुरू केले. म्हणून जीवनात जर पुढे जायचे असेल तर प्रेरणादायी मार्गदर्शन घेतले पाहिजे. तसेच आपल्याला जर उच्च पद गाठायचे असेल तर स्वतःमध्ये सकारात्मक बदल करणे आवश्यक आहे. त्याबरोबर परिश्रम करण्याची तयारी, आत्मविश्वास पूर्ण संभाषण या बाबी देखील महत्वाच्या आहेत. जिद्द व चिकाटीच्या जोरावर अनेक अवघड परीक्षा सहज उत्तीर्ण करता येतात म्हणून जीवनात आई, वडील व गुरुजन यांचा आदर राखावा व त्यांच्या प्रेरणेने, मार्गदर्शनाने जीवनाचे ध्येय गाठावे.' असे प्रतिपादन पोलीस उप-अधीक्षक राजश्री पाटील यांनी केले.

गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुटमध्ये 'जागतिक महिला दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून पोलीस उप-अधीक्षक राजश्री पाटील ह्या मार्गदर्शन करत होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून पंढरपूर विभागाच्या ब्रम्हकुमारी उज्वला बहेनजी ह्या होत्या तर विशेष अतिथी म्हणून मंत्रालयातील अधिकारी विक्रम शिंदे हे उपस्थित होते. महाराष्ट्र गीत व स्वेरी गीता नंतर प्रास्ताविकात स्वेरीचे संस्थापक सचिव व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे म्हणाले की, 'कोणत्याही प्रसंगांना सामोरे जात असताना आपल्याला नवनवीन बाबी शिकायला मिळत असतात. त्यामुळे समाजात वावरताना आपण विविध बाबी शिकून घेतल्या पाहिजेत. मिळणाऱ्या यशानं हुरळून जायचे नाही आणि जर दु:ख वाट्याला आले तर खचून जायचे नाही. हाच जीवनाचा मार्ग आहे.' असे सांगून त्यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माँ जिजाऊ, अंतराळ कन्या कल्पना चावला, सुनीता विल्यम्स, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, महिला आयपीएस अधिकारी किरण बेदी व स्वेरीच्या माजी विद्यार्थिनी स्वाती सापळे या यशस्वी महिलांचा संघर्षात्मक प्रवास सांगितला. विशेष अतिथी विक्रम शिंदे म्हणाले की, 'महिलांची आजची परिस्थिती बदलण्यासाठी सर्वात प्रथम आपली मानसिकता बदलली पाहिजे. आज मी पत्नीमुळे स्वेरीच्या या स्टेजवर येवू शकलो. आज मंत्रालयामध्ये काम करत असताना सिव्हिल इंजिनिअरिंग झालेल्या कोणत्याही विद्यार्थ्याला अडचण आल्यास हाक द्या, मार्गदर्शन करतो. स्पर्धा परीक्षा संदर्भात केव्हाही मी विद्यार्थ्यांना केंव्हाही सहकार्य करण्यास तयार आहे.' अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रमुख पाहुण्या उज्वला बहनजी म्हणाल्या की, 'जेथे नारीची पूजा होते तेथे देवता वास करते. धन देवता, शक्ती देवता, ज्ञान देवता ह्या सर्व महिला आहेत. त्यामुळे प्रथम महिलांचे नाव घेतले जाते. आपण ज्या क्षेत्रात काम करतो आहे तेथे देखील महिलांचा आदर सन्मान केला पाहिजे. आज प्रत्येक क्षेत्रात महिला कार्य करत आहेत. आपल्याला जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आपले ध्येय निश्चित करावे व त्या दिशेने प्रामाणिक वाटचाल करावी.' असे सांगून उपस्थितांकडून दहा मिनिटे 'मेडिटेशन' करून घेतले. पोलीस उप-अधीक्षक राजश्री पाटील पुढे म्हणाल्या की, 'आई, बहीण, पत्नी, मुलगी यांच्याकडे काळजीने पहा. त्यांच्यात आपलेच नातेवाईक दिसतील. आपल्यावर झालेले संस्कार हे अत्यंत महत्त्वाचे आहेत. त्यामुळे संस्कृतीला शोभेल असे वर्तन असावे. त्याचा भविष्यात करिअर करताना फायदा होतो. विद्यार्थी दशेत मोबाईलचा कमीत कमी व आवश्यक असेल तरच वापर करा. मी स्पर्धा परीक्षा देवून इथपर्यंत आले असले तरीही माझे अजूनही फेसबुक, ट्वीटर व इंस्टाग्राम अकाउंट नाही. एकूणच सोशल मिडीयावर वेळ वाया घालू नका. त्या ऐवजी संदर्भ ग्रंथ, प्रेरणादायी पुस्तके तुम्ही हाताळू शकता ज्याचा भविष्यात फायदा होतो. संस्कारित होण्यासाठी कुटुंब व्यवस्था, नातेसंबंध, व्यवहारज्ञान यावर भर द्या,' असे सांगून डीवायएसपी राजश्री पाटील यांनी अनेक कर्तबगार महिलांची उदाहरणे दिली तसेच महासंचालक रश्मी शुक्ला व प्रशासनाचे प्रमुख सुजाता सबनीस या महिलांच्या कार्यावर प्रकाश टाकला. स्पर्धा परीक्षा विषयी अनेकांनी प्रश्न विचारले असता त्याला विक्रम शिंदे आणि राजश्री पाटील यांनी समर्पक उत्तरे दिली. महिला दिनाच्या निमित्ताने स्वेरीच्या वतीने गुणवंतांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे माजी अध्यक्ष व विश्वस्त एन.एस.कागदे, सौ. वंदना रोंगे, यांच्यासह स्वेरी अंतर्गत असलेल्या बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम.जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डिग्री इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ. एम.एस.मठपती, इतर अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थिनी प्रतिनिधी नम्रता घुले, इंजिनिअरिंग व फार्मसीच्या पदवी व पदविका या चारही महाविद्यालयांतील विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. नेहा घोरपडे, पूनम शिंदे व डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले तर संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब रोंगे यांनी आभार मानले.

**स्वेरीच्या माजी विद्यार्थिनी रेश्मा चव्हाण ह्या सिव्हिल इंजिनिअरिंगची पदवी घेवून आज त्या मंत्रालयात कामकाज करत आहेत. प्रत्येक मंत्र्यांच्या निवासाचे त्या उत्तम नियोजन करत आहेत. या गोष्टीचा खूप अभिमान वाटतो यावरून प्रेरणा मिळते.**

**-विक्रम शिंदे, अधिकारी मंत्रालय, मुंबई.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### विवाहितेच्या चारित्र्यवर संशय घेऊन केली मारहाण; पतीसह पाच जणांविरुद्ध गुन्हा

सोलापूर : विवाहितेच्या चारित्र्यावर संशय घेऊन नोकरीवर कायम होण्यासाठी पाच लाख रुपयांची आवश्यकता आहे ते माहेरून आण तरच मुलीला नांदायला घेतो अन्यथा तुला नांदवणार नाही अशी धमकी दिल्याची घटना १८ डिसेंबर २०२२ ते १५ जानेवारी २०२५ दरम्यान सासरी शहाबाद गुलबर्गा या ठिकाणी घडली. याप्रकरणी ज्योती विशाल कलाल (वय २२, रा. सोशल नगर, विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्यादी दिली. त्यांच्या फिर्यादीवरून पती विशाल, सासू रेखा, दिर वसंत नणंद आशा, सासरे मोहन (सर्व रा. इंदिरा नगर मड्डी, शहाबाद, ता. चित्तापूर, जि. गुलबर्गा) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. माहिती अशी की, फिर्यादी या सासरी नांदताना यातील वरील संशयित आरोपींनी किरकोळ कारणावरून शिवीगाळ करून शारीरिक व मानसिक त्रास दिला. तसेच विशाल कलाल यांनी फिर्यादीच्या चरित्रावर संशय घेऊन मारहाण केली. तसेच माहेरून पाच लाख रुपये घेऊन ये तरच तुला नांदवतो अन्यथा नांदविणार नाही अशी धमकी देऊन हुंड्याची मागणी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# विधान परिषदेसाठी मा. आ. प्रशांत परिचारक व मा. आ. रामभाऊ सातपुते यांच्या नावाची चर्चा

## २७ मार्च रोजी निवडणुक; कोणाची वर्णी लागणार याबाबत सर्वत्र चर्चा सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/तिनिधी : सोलापूर जिल्ह्यातून मा.आ. प्रशांत परिचारक व.मा.आ. रामभाऊ सातपुते यांच्या नावाची चर्चा.



विधान परिषदेच्या रिक्त जागांसाठी भारतीय जनता पक्षामध्ये मोर्चेबांनी सुरू झाले असून सोलापूर जिल्ह्यातील माजी आमदार प्रशांत परिचारक व माजी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या नावाची चर्चा चालू असून.

माजी आमदार प्रशांत परिचारक यांना संधी देऊन पक्ष त्यांचे पुनर्वसन करणार का? हे पहाणे या निमित्ताने उत्सुकतेची ठरणार आहे.

विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त झाल्या असून त्यासाठी २७ मार्च रोजी निवडणूक होणार आहे या पाच जागेमध्ये भाजपच्या तीन शिवसेना शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार प्रत्येकी एक जागा आहेत. येत्या २७ मार्च रोजी निवडणुकीसाठी मतदान होणार असून या जागेवर कोणाची वर्णी लागणार याबाबत सर्वत्र चर्चा सुरू झाल्या असून माजी आमदार प्रशांतराव प्रचारक यांना संधी दिली जाईल अशी चर्चा आहे.

सोलापूर जिल्ह्यातून माजी आमदार रामभाऊ सातपुते व प्रशांत परिचारक यांची नावं विधान परिषदेसाठी सर्वत्र चर्चेली आहे विधान परिषदेच्या पाच जागा रिक्त झाले आहे ते २७ मार्चला निवडणूक होणार आहे या पार्श्वभूमीवर माजी आमदार प्रशांत परिचारक यांना संधी देऊन पक्ष त्यांची पुनर्वसन करणार का. हे पाहणे आता महत्त्वाची ठरणार आहे.



# पंढरीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार उद्योग व व्यापार विभाग यांच्या वतीने नूतन अधिकाऱ्यांचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने कोर्टी तालुका पंढरपूर येथे महाराष्ट्र राज्य सेवा आयोग मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षांमध्ये पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला यामध्ये कपिल भारत घोडके यांची सरळ सेवेतून आरोग्य सेवक या पदासाठी निवड झाली आहे.

तसेच सागर दिलीप जगताप यांची तलाठी (ग्राम महसूल अधिकारी) या पदासाठी निवड झाली आहे औदुंबर गव्हाणे यांची पुणे ग्रामीण पोलीस हवालदार या पदासाठी निवड झालेली आहे. तसेच माणिकराव मस्के आरोग्य सहाय्यक पंढरपूर तालुका आरोग्य पर्यवेक्षक यांची सेवानिवृत्ती निमित्त त्यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी प्रदेशाध्यक्ष नागेश पाटील यांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी डॉक्टर रमेश फाटे, संजय पवार, भारत घोडके, दिलीप जगताप, औदुंबर गव्हाणे, गुजर, निवृत्ती पाटील पुणेकर, ओमकार कटले, कुसुम घोडके, वर्षाराणी गव्हाणे, स्वराज जगताप, रोहिणी जगताप, राजश्री मस्के साक्षी मस्के, श्री आदमिले इत्यादी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून उपेक्षित बहुजन समाजातील जनतेची निरपेक्ष भावनेने सेवा करणार : तानाजी कदम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस.के.गायकवाड : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संकल्पनेतून त्यांच्या खुल्या पत्रावर अधारीत स्थापन झालेल्या नामदार रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पार्टी आफ इंडिया हा पक्ष देशातील तमाम बहुजनांच्या न्याय हक्कासाठी लढणारा पक्ष असून रिपब्लिकन पक्षाच्या माध्यमातून बहुजन समाजातील उपेक्षित जनतेची मी निरपेक्ष भावनेने सेवा करणार असे प्रतिपादन रिपाइ आठवलेचे नुतन मराठवाडा विभाग उपाध्यक्ष तानाजी कदम यानी नळदुर्ग ता.तुळजापूर येथे बोलताना केले.



रिपब्लिकन पार्टी आफ इंडियाच्या नुकतेच धाराशिव येथे झालेल्या जिल्हा बैठकीत रिपाइं चे राष्ट्रीय अध्यक्ष तथ सामाजिक न्याय मंत्री भारत सरकार नामदार रामदास आठवले यांच्या आदेशानुसार तुळजापूर येथील रिपाइंचे निष्ठावंत कार्यकर्ते तथा माजी जिल्हा सरचिटणीस तानाजी कदम यांची मराठवाडा विभाग उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. त्यांच्या या सार्थ निवडी नतर ते पहिल्यांदाच नळदुर्ग शहरात आले असता रिपाइं (आठवले) अल्पसंख्यांक आघाडी तुळजापूर व रिपाइं नळदुर्ग शहर शाखेच्या वतीने त्यांचा तथोचित सत्कार करण्यात आला.यावेळी ते सत्काराला उत्तर देताना बोलत होते.

या प्रसगी रिपाइं चे मराठवाडा विभाग कार्यकारणी सदस्य दुर्वास बनसोडे, जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के.गायकवाड,युवा आघाडी जिल्हा कार्याध्यक्ष अरूण लोखंडे,रिपाइं आल्पसंख्याक आघाडी चे तालुका अध्यक्ष बाशिदभाई कुरेशी, कामगार आघाडीचे तुळजापूर शहराध्यक्ष रवी वाघमारे, रिपाइं नळदुर्ग शहर कार्याध्यक्ष महादेव कांबळे, अनिल वाघमारे, आरविंद लोखंडे, जेष्ठ कार्यकर्ते जमिलभाई कुरेशी, मैनोदिन इनामदार,एकबाल कुरेशी,उत्तम झेंडारे, युवा कार्यकर्ते विश्वास रणे, बाबासाहेब वाघमारे, अजीम कुरेशी, वशिम कुरेशी, दादा कुरेशी, सह कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

### तु येथे पाणी भरायचे नाही म्हणत केली मारहाण

सोलापूर : भवानी पेठ येथे घरासमोर असलेल्या बोरवेलवर पाणी भरताना तू या ठिकाणी पाणी भरायचे नाही असे म्हणून मारहाण केल्याची घटना सहा मार्चला घडली. याप्रकरणी भास्कर नागराज इराबत्ती (वय ३५, रा. भवानी पेठ, घोंगडे वस्ती) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यांच्या फिर्यादीवरून श्रीकांत कोळी (रा. भवानी पेठ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. माहिती अशी की, यातील फिर्यादी हे घरासमोर असलेल्या बोअरवेलवर फिर्यादीचा भाऊ पाणी भरताना संशयित आरोपीने तू या ठिकाणी पाणी भरायचे नाही म्हणून शिवीगाळ केली. तसेच हाताने मारहाण केली. यावेळी फिर्यादी भांडण सोडविण्यास आल्यावर संशयित आरोपीने खाली पडलेला दगड उचलून फेकून मारल्याने डोक्यात जखम झाली असल्याचे फिर्यादी नमूद आहे.

# जिल्हाधिकारी यांची निफाड नगरपंचायतला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नगरपंचायत कार्यालय निफाड येथे जिल्हाधिकारी यांनी भेट देऊन विविध कामांचाआढावा घेतला.

या प्रसंगी बैठकीमध्ये दैनंदिन कामकाज तसेच शहरात

**नगरपंचायतीचे विविध कामांचा घेतला आढावा**

सुरू असलेले सर्व विकासकामे नवीन पाणीपुरवठा योजना व नगरपंचायत मार्फत देण्यात येणाऱ्या सोयी सुविधा बाबत सविस्तर आढावा घेऊन मुख्याधिकारी चौधरी यांच्याकडून माहिती जाणून घेतली ,तसेच घनकचरा व्यवस्थापन सांडपाणी प्रकल्प व शहरातील अतिक्रमण याबाबत विविध विभाग यांना तात्काळ निर्देश देऊन सदरचे विषयी मार्गी लावणे बाबत आदेश देण्यात आले.

सदर बैठकीदरम्यान, प्रांत अधिकारी हेमांगी पाटील, तहसीलदार विशाल नाईकवाडे नगरपंचायत चे मुख्यअधिकारी अमोल चौधरी व पोलीस निरीक्षक गणेश गुरव, निफाड नगरपंचायतचे उपनगराध्यक्ष अनिल पाकुंदे, नगरपंचायत नगरसेवक साहेबराव बर्डे, किशोर ढेपले, देवदत्त कापसे, संदिप जेऊघाले, नंदकुमार कापसे, आदी नगरसेवक तसेच नगरपंचायत चे कर्मचारी यावेळी उपस्थित होते

# एंजलवनच्या सहकार्याने राह फाउंडेशनच्या सोलापूर सेंटरतर्फे भव्य नोकरी मेळावा, प्रमाणपत्र वितरण समारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : २८ फेब्रुवारी २०२५ – एंजलवनच्या सीएसआर निधीतून राह फाउंडेशनच्या अंतर्गत सेवा फाउंडेशन, सोलापूर सेंटरच्या ६वी, ७वी आणि ८वी बॅचच्या विद्यार्थ्यांसाठी भव्य प्रमाणपत्र वितरण समारंभ व नोकरी मेळाव्याचे आयोजन समाज कल्याण हॉल, सोलापूर येथे करण्यात आले. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा मुख्य उद्देश होता.

समर्थ कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत युवकांना संपूर्ण ज्ञान, संवाद कौशल्ये आणि रोजगारक्षमतेसाठी आवश्यक प्रशिक्षण देण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी दिशा देणे हा होता. प्रमाणपत्र वितरण समारंभात प्रसिद्ध वर्तमानपत्राचे उपसंपादक आणि मुख्य अतिथी मा. श्री. भरतकुमार मोरे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी एंजलवन कंपनीच्या योगदानाबद्दल विशेष आभार मानण्यात आले.

या नोकरी मेळाव्यात सोलापूर शहरातील प्रतिष्ठित कंपन्यांनी सहभाग घेतला. त्यामध्ये ग्रे व्हाईट, सिसूर सृष्टी एंटरप्रायजेस आणि ओला इलेक्ट्रिक व्हेइकल्स या प्रमुख कंपन्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मुलाखतीच्या संधी देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे आयोजन राह फाउंडेशनचे श्री. शुभम खरात (सिनीयर मॅनेजर, स्किल डेव्हलपमेंट), श्री. अश्विन साखरे आणि अंतर्गत सेवा फाउंडेशनचे श्री. विवेक यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात श्रीमती मनिषा वाघमारे यांच्या प्रास्ताविकाने झाली, तर संपूर्ण सूत्रसंचालन मानसी गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी शीतल कांबळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या उपक्रमात एकूण ६५ विद्यार्थी उपस्थित होते, त्यापैकी ४७ विद्यार्थ्यांची पूर्वनियोजित यादी तयार झाली आणि ३२ विद्यार्थ्यांना नोकरीच्या संधी मिळाल्या. राह फाउंडेशन आणि एंजलवन यांच्या सहकार्याने हा उपक्रम यशस्वीपणे पार पडला. शिक्षण आणि रोजगार यामधील दरी कमी करण्याच्या उद्देशाने राबवलेल्या या उपक्रमामुळे युवकांना करिअरसाठी महत्त्वाच्या संधी उपलब्ध झाल्या.

मुख्य अतिथी श्री. भरतकुमार मोरे यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन करताना एंजलवन कंपनीच्या मदतीने सोलापूर सेंटर उभारण्यात आले असून त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना फायदा झाल्याचे सांगितले.

राह फाउंडेशनचे श्री. शुभम खरात यांनी विद्यार्थ्यांना जोहरी खिडकी आणि इकिगाई संकल्पनांद्वारे आत्मविश्लेषण करून योग्य करिअर




निवडण्याचे आवाहन केले आणि त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच श्री. निखिल यांनी ग्रे नाईट कंपनीविषयी माहिती देऊन संवाद कौशल्ये आणि मायक्रोसॉफ्ट एक्सेलसारख्या तांत्रिक कौशल्यांच्या गरजेवर भर दिला. सनसूर सृष्टी खादी ग्रामोद्योग चे श्री. अब्बास यांनी आपल्या कंपनीविषयी माहिती देऊन विद्यार्थ्यांना मुलाखतींसाठी संधी दिली. तसेच ओला इलेक्ट्रिक व्हेइकल्स शोरूमचे श्री. आदित्य यांनीही आपल्या कंपनीविषयी माहिती देत रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या.

या उपक्रमामुळे अनेक विद्यार्थ्यांना रोजगार मिळवण्याचा मार्ग खुला झाला आहे. राह फाउंडेशन भविष्यातही अशाच प्रकारच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे.

**शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त**

**हमीभावाचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा**

# शेतकरी हित जोपासणारी लोहटा येथील संताई हमी भाव खरेदी केंद्र



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील लोहटा येथे नाफेड व महाकिसान संघ अंतर्गत संताई हमी भाव खरेदी केंद्र लोहटा या खरेदी केंद्रा वर मोठ्या प्रमाणात सोयाबीन खरेदी हमी भावाने करण्यात आली. तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांनी सोयाबिन विक्री करुन लाभ घेतला. सोयाबिन पाठोपाट तूर खरेदी चालू झालेली आहे मात्र शेतकऱ्यांनी तूर पिकाची ई पिक पाहणी केलेली नसल्या मूळे लोहटा हमी भाव खरेदी केंद्र बंद ठेवावे लागत आहे. आडत वरील भाव आणि तुरीचे हमी भाव समान चालत आहेत आणि त्यात ई पिक पाहणी चा नियम असल्या मूळे शेतकरी तूर आडती वर पाठवत आहेत. सध्या या करणा मूळे हमी भावाने तूर खरेदी चालू होऊन जिल्यातील अनेक सेंटर बंद आहेत. औसा तालुक्यात ०.२% शेतकऱ्यांनी सुद्धा तूर पिकाची ई पिक पाहणी केलेली नाही. आता येणाऱ्या काळात लोहटा सेंटर ला हमी भावाने हरभरा खरेदी ही चालू होणार आहे हरभरा भाव ५६५० रु आहे. सर्व शेतकऱ्यांचे चेअरमन शुभम शिवाजीराव साठे यांनी सोयाबीन खरेदी साठी आभार मानले आहेत आणि येणाऱ्या काळात आपले सहकार्य असेच राहो अस मत व्यक्त केल आहे.

सोयाबिन खरेदी करत असताना तळागळातील शेतकऱ्यांना सरकारच्या हमिभावाचा फायदा घेता यावा यासाठी संताई खरेदी केंद्राच्या माध्यमातुन चेअरमन शुभम साठे यांनी जास्तीत जास्त शेतकर्यांना शासकीय हमीभावाचा लाभ घेता याव यासाठी अहोरात्र प्रयत्न केले, व संताई खरेदी केंद्रावर शेतकर्याचा सोयाबिन घेउन शेतकर्यांना हमीभाव दिल्याने संताई खरेदी केंद्राच सर्वत्र कौतुक होत असल्याच पहायला मिळाले.

# विकास भिवा पवार एमपीडीए कायद्यान्वये स्थानबद्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : शहरातील सराईत गुन्हेगार विकास भिवा पवार (वय २४, रा. धोत्रीकर वस्ती, भवानी पेठ) या सराईत गुन्हेगारावर एमपीडीए कायद्याच्या अंतर्गत कारवाई करण्यात आली असून, त्याला येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल करण्यात आले आहे. ही कारवाई गुरुवारी (दि.६) मार्चला करण्यात आली.

शहरातील एमआयडीसी, जोडभावी पेठ, फौजदार चावडी, सलगर वस्ती आणि सदर बझार पोलीस ठाण्याच्या हद्दीत गत काही वर्षांपासून सातत्याने जीव घेण्या घातक शास्त्राने इच्छापूर्वक दुखापत करणे, जबरी चोरी करणे, खंडणी मागणी, घोरफोडी करणे, मोटरसायकल चोरी करणे, बेकायदेशीर जमाव जमवणे, दगडफेक करणे, आणि घातक शस्त्राने धमकाविणे यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे साथीदारांच्या मदतीने अवैध आर्थिक फायदा मिळवण्यासाठी करीत आला आहे.

त्याच्याविरुद्ध अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकूण १५ गुन्हे शहरात दाखल आहेत. त्याच्या या गुन्हेगारी कृत्यामुळे शहरातील नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन सार्वजनिक व्यवस्थेस बाधा निर्माण झाली आहे. विकास पवार यास त्याच्या गुन्हेगारी करावयापासून परावृत्त करण्यासाठी २०२२ मध्ये प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. त्यानंतर विकास पवार यांच्या वर्तनात कोणताच बदल झाला नाही. त्याने सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा होईल अशी गुन्हेगारी कृत्य चालू ठेवली.

त्याच्या गुन्हेगारी कृत्यास प्रतिबंध करण्यासाठी पोलिस आयुक्त एम राजकुमार यांनी ५ मार्चला त्याच्याविरुद्ध एमपीडीए अधिनियम १९८१ चे कलम ३ अन्वये स्थानबद्धतेचे आदेश निर्गमित करून सहा मार्चला स्थानबद्ध आदेशाची बजावणी करून येरवडा कारागृह, पुणे येथे दाखल करण्यात आले.

## थोडक्यात...




### बॉण्डवर सही घेऊन घरावर केला कब्जा

सोलापूर : इंदिरानगर येथे बॉण्डवर सही घेऊन घरावर कब्जा केल्याची घटना १० जून २०२३ ते आजतागायत घडली. याप्रकरणी सारिका सुनील वाटीकर (वय-४२, रा. ७० फूट रोड, इंदिरा नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यांच्या फिर्यादीवरून दीपक गुरप्पा कनले (वय ७०, रा. इंदिरानगर) याच्या विरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

या अधिक माहिती अशी की, यातील संशयित आरोपी याने फिर्यादीच्या पतीच्या आजारपणाचा फायदा घेऊन कोऱ्या बॉण्डवर सही घेऊन फिर्यादीच्या नावे असलेल्या भारतरत्न इंदिरा नगर बी झोपडपट्टी क्रमांक ७९७ या झोपडपट्टीवर कब्जा केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# औसा तालुक्यात अवैद्य सावकारी जोमात

# सावकार तुपाशी तर गरजु उपाशी

## औसा तालुक्यात अवैध सावकारीचा सुळसुळाट – प्रशासन झोपले की झोपेचे सोंग?

## स्मॉल फायनान्स च्या नावाखाली विनापरवाना सावकारी, अनेक तरुण, नवयुवक सावकारीच्या जाळ्यात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यात फायनान्सच्या नावाखाली अवैध सावकारी मोठ्या प्रमाणात सुरू असून, गरजू नागरिकांना उच्च व्याजदराने कर्ज देऊन त्यांची आर्थिक पिळवणूक केली जात आहे. गरीब आणि मध्यमवर्गीय नागरिकांना आर्थिक मदतीचं आमिष दाखवून सावकार त्यांना कर्जाच्या जाळ्यात अडकवत आहेत. वेळेवर परतफेड न झाल्यास धमक्या, मानसिक छळ आणि मालमत्ता गहाण ठेवण्यास भाग पाडले जात आहे.

सावकारांचे वाढते मनोबल – गरिबांचे शोषण सुरूच



अनेक सावकार स्वतःला फायनान्स व्यावसायिक म्हणून घोषित करून गरजू नागरिकांना मोठ्या व्याजदराने कर्ज पुरवतात. कर्ज घेताना सहज परतफेडीच्या अटी ठरवल्या जातात, मात्र काही दिवसांतच व्याज वाढवले जाते. कर्जफेडीला विलंब झाल्यास जप्तीच्या धमक्या आणि जबरदस्ती सुरू होते.

प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सावकार बळकट

औसा तालुक्यात अनेक गावांमध्ये सावकारीचा प्रभाव वाढला असून, या सावकारांना राजकीय आश्रय असल्याचे बोलले जाते. महसूल विभाग आणि पोलिसांकडून ठोस कारवाई होत नसल्याने या सावकारांचे मनोबल दिवसेंदिवस वाढत आहे. नागरिक भयभीत झाल्यामुळे बहुतांश प्रकरणं उघडच होत नाहीत.

सरकारने कठोर भूमिका घ्यावी!

अवैध सावकारीच्या विळख्यात अडकलेल्या नागरिकांना न्याय मिळावा यासाठी शासनाने तातडीने कठोर भूमिका घ्यावी. पोलिस व सहकार विभागाने अशा सावकारांची नोंद घेऊन त्वरित कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. नागरिकांनीही अधिकृत बँका आणि सहकारी संस्थांमधूनच कर्ज घ्यावे, जेणेकरून सावकारांच्या जाळ्यात अडकण्याचे प्रमाण कमी होईल.

## पुरंदरची भिवरी गावची कुमारी अमृता कटके हिला मिळाला राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून सुवर्णकन्येचा मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पुरंदर प्रतिनिधी/ डॉ विनायक गायकवाड : पुरंदर : मौजे भिवरी तालुका. पुरंदर जिल्हा पुणे येथील कु.अमृत दादासो कटके ही आपल्या मेहनतीच्या व जिद्दीच्या जोरावर राष्ट्रीय स्पर्धेत सुवर्णपदक जिंकून पुरंदरची सुवर्णकन्या ठरली आहे. कानिफनाथ विद्यालय भिवरी येथे शिक्षण घेत असतानाच तिला खेळाची प्रचंड आवड होती, यावेळी क्रीडाशिक्षक मधुसूदन सेंडकर व तिचे वडील दादासो कटके यांनी तिच्या गोळा फेक खेळातील कौशल्य पाहून तिला मार्गदर्शन करण्यास सुरुवात केली, पहिल्याच वर्षी राज्यस्तरीय स्पर्धेत लखविंदर सिंग यांच्याकडे मार्गदर्शनासाठी पाठवले, पुढे तिने तंत्रशुद्ध शिक्षण घेऊन तिची निवड तिरुपती येथे राष्ट्रीय स्पर्धेसाठी झाली, रांची झारखंड येथे झालेल्या शालेय राष्ट्रीय स्पर्धेत ती सहभागी झाली तिथे तिने सुवर्णपदक पटकावत तिच्यातील विश्वास सार्थ करून दाखविला, आता तिचे ध्येय चार वर्षानंतर होणाऱ्या आशिया स्पर्धेत सुवर्णपदक मिळवण्याच्या असून त्यासाठी ती कसून कसरत व सराव करत आहे. पुरंदरच्या या कन्यने सुवर्णपदक मिळवल्याने संपूर्ण तालुक्यामध्ये तिच्यावर अभिनंदन चा वर्षाव होत आहे.

# पंढरपूर शहर पोलीस ठाणे तसेच निर्भया पथक यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस संकुल येथे जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : आज रोजी पोलीस संकुल येथे*महिला दिनाच्या औचित त्याने*कार्यक्रम आयोजित केला होता. त्या अनुषंगाने सदर करा मग कार्यक्रमात महिलाविषयक नवीन कायदे यांची माहिती देण्यात आली. तसेच महिला व विद्यार्थिनींना डएडऋ-ऊत्रएछएडची प्रात्यक्षिके दाखवून स्वतःला बचाव कसा करावा याची माहिती दिली. मावळा अक्॓डमी, युनिक अक्॓डमी, रणझुंजार अक्॓डमी, विद्यार्थिनींचा सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. सदर कार्यक्रमाकरिता पंढरपूर शहरातील जवळपास ३००ते३५० महिला व तसेच महाविद्यालयातील विद्यार्थिनी सौभाग नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

. सदरचा कार्यक्रम हा सह पोलिस अधीक्षक श्रीमती अंजना कृष्णा मॅडम यांच्या प्रमुख उपस्थितीत पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी डॉक्टर अर्जुन भोसले, पंढरपूर शहर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वजीत घोडके, यांच्या मार्गदर्शनाखाली पंढरपूर शहर पोलीस स्टेशनच्या मपोस मोनिका खडके पाटील, सुप्रिया रावण मॅडम,सपोनि. विभावरी रेळेकर, मॅडम पंढरपूर शहर पोलीस स्टेशन कडील महिला पोलीस व अंमलदार यांनी यशस्वी पार पाडला.

# कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा आदर्श इतरांनी घ्यावा : मुख्याध्यापक उगले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : मराठा विद्या प्रसारक समाज संस्था संचलीत डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले होते. व्यासपीठावर पंचायत समितीचे माजी उपसभापती शंकरराव वामने, सरपंच रामनाथ पावसे, विद्या ठाकरे, सीमा गोसावी, वरिष्ठ लिपिक राणी शिंदे, रोहिणी भगत, ललिता वारुंगसे, उषा वाजे, परवीन शेख आदी उपस्थित होते.उपस्थितांच्या हस्ते कर्तृत्ववान महिलांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. उपस्थित महिलांचा पेन,गुलाबपुष्प व लघुवस्त्र देऊन गौरव करण्यात आला. डुबेरे गावच्या सरपंचपदी रामनाथ पावसे यांची निवड झाल्याबद्दल विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

**डुबेरे विद्यालयात जागतिक महिला दिन**

यावेळीबोलताना विद्यालयाचे मुख्याध्यापक रंगनाथ उगले म्हणाले की, महिलांनी अनादी काळापासून सर्व क्षेत्रात उल्लेखनीय कार्य व प्रगती केली आहे. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात देखील महिलांनी सक्रिय सहभाग घेतला होता. आज सर्व क्षेत्रात महिला अग्रेसर आहे. महिलांचे रक्षण व संरक्षण करण्याची जबाबदारी आपली सर्वांची आहे. अशा कर्तृत्ववान महिलांच्या कार्याचा आदर्श इतरांनी घ्यावा असे आवाहन उगले यांनी केले.




तनुजा निमसे, मानसी जाधव, दृष्टी ढोन्नर, उर्मिला सदगीर या विद्यार्थ्यांसह उपशिक्षिका कल्पना शिंदे,जयश्री गोहाड यांनी महिला दिन का साजरा करतात ? कर्तृत्ववान महिलांचा इतिहास याविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती सांगितली. इयत्ता ९ वी तु-अच्या विद्यार्थ्यांनी वर्गशिक्षक सोमनाथ बोडके व पी.आर. करपे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन केले होते. सूत्रसंचालन कुमारी अंकिता ढोली, मानसी हिरे, कोमल वाघ व श्रावणी पावसे यांनी तर आभार उपशिक्षक पी. आर.करपे यांनी मानले. यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# मराठीचा अवमान करणाऱ्या जोशींचा ठाकरे शिवसेनेने केला निषेध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

लातूर : मराठी भाषेविषयी वादग्रस्त वक्तव्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे भैय्याजी जोशी यांचा लातूर जिल्हा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्यावतीने येथील महात्मा गांधी चौकात शुक्रवारी (दि.७) निदर्शने करून जाहीर निषेध करण्यात आला. शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते भैयाजी जोशी यांनी मुंबईत येणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, असे नाही, असे वक्तव्य करून मराठी भाषेचा व मराठी माणसाचा अपमान केला आहे. या वक्तव्याचा निषेध म्हणून जिल्हा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वात शुक्रवारी लातूरच्या महात्मा गांधी चौकात जोशी यांच्या विरोधात घोषणाबाजी देत निषेध आंदोलन करण्यात आले. भैय्याजी जोशी यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणी संतोष सोमवंशी यांनी यावेळी बोलताना केली.

या आंदोलनात शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष सोमवंशी यांच्यासह शिवसेना सहसंपर्कप्रमुख नामदेव चाळक, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, महिला जिल्हा संघटक सौ. सुनीता चाळक, उपजिल्हाप्रमुख बालाजी जाधव, सी. के. मुरळीकर, शहरप्रमुख विष्णू साठे, रमेश माळी, एस. आर. चव्हाण, बसवराज मंगरूळे,माधव कलमुकले, शंकर रांजणकर, विलास लंगर, कैलास पाटील, दत्तु मोरे, भास्कर माने, सुरज बाहेती, मारुती सुर्यवंशी, मारुती सांवत, राजू कतारे, राजू घटमल, रोहित दोपारे, गणेश गंगणे, प्रदीप बनसोडे, विष्णू कांबळे, कृष्णा जाधव, प्रेम शाहीर, राम चोथवे, सोमनाथ आग्रे, परमेश्वर कांबळे, अभिजित गायकवाड यांचेसह शिवसेनेचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पवित्र रमजान महिन्यातील दोन चिमुकल्या कोनेन साराचा रोजा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग या ऐतिहासिक शहरातील प्रतिष्ठित युवा व्यापारी हालीम पटेल यांच्या दोन्ही लहान चिमुकल्या कोनेन व साराचा रोजा पवित्र महिन्यातील रोजा संपन्न झाला.

मुस्लिम धार्मियाच्या सध्या सुरु असलेल्या पवित्र रमजान महिना सुरु आहे यामध्ये दररोज रोजा ठेवण्यात येते नळदुर्ग शहरातील निलम कलेक्शनचे मालक व युवा व्यापारी हालीम पटेल यांच्या दोन लहान मुलींनी रोजा ठेवला होता.


कोनेन हालीम पटेल वय ५ वर्ष व सारा हालीम पटेल वय ७ वर्ष या दोन लहान मुलींनी १३ तास रोजा केला आहे खरं तर एवढ्या लहान वयामध्ये अशा पद्धतीने रोजा केल्याबद्दल या दोन्ही गाव स्तरातुन मुलींचे सर्वत्र कौतुक होतं आहे.

# रिपाइं श्रमिक ब्रिगेडच्या तालुका उपाध्यक्षपदी कल्लेश्वर पाटील व सिमा कुंभार यांची नियुक्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर प्रतिनिधी/डॉ. विनायक गायकवाड : रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडच्या पुरंदर तालुका उपाध्यक्षपदी कल्लेश्वर पाटील तर पुरंदर महिला आघाडीच्या उपाध्यक्षपदी सिमा मच्छींद्र कुंभार यांची नियुक्ती करण्यात आली.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले श्रमिक ब्रिगेडचे पुरंदर तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे आणि पुरंदर तालुका महिला आघाडीच्या अध्यक्षा रोहीणीताई कुंभारकर यांच्या शिफारशीनुसार रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले यांनी



त्यांना नियुक्ती पत्र दिले.

यावेळी समता कृतीचे संपादक दिगंबर कदम तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे, महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा रोहीणीताई कुंभारकर तालुका संघटक सचिव मंगेश इभाड आदि उपस्थित होते.

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली पुरंदर तालुक्यामध्ये विविध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम सुरु असल्याने प्रभावित होऊन, अनेक बहूजन समातील कार्यकर्ते महिला भगिनी , रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेड मध्ये सहभागी होत आहेत, त्यानुसार लघु उद्योजक कल्लेश्वर पाटील व सिमताई कुंभार यांनी रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडमध्ये काम करण्याची इच्छा व्यक्त केल्याने त्यांची वरील पदावर नियुक्ती करण्यात आली, नियुक्ती नंतर प्रतिक्रिया देताना, रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन श्रमिक ब्रिगेडचे प्रदेश अध्यक्ष डॉ सतीश केदारी, प्रदेश सरचिटणीस विष्णूदादा भोसले, प्रदेश संघटक सचिव गोविंद जगताप, जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस, तालुका अध्यक्ष कालीदास उबाळे व महिला आघाडीच्या तालुका अध्यक्षा रोहीणीताई कुंभारकर यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील सर्व सामान्य नागरीकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने काम करु, अशी प्रतिक्रिया दिली.

**पाताळेश्वर माध्यमिक विद्यालय पाडळी येथे महिला दिन साजरा**

**मला अधिकारी व्हायचंय या उपक्रमांतर्गत मुलींना विशेष मार्गदर्शन**

# प्रयत्नांनी यशाची वाटचाल करून ध्येयाकडे जा : आर्मी कॅप्टन प्रितीश पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : पाताळेश्वर माध्यमिक विद्यालय पाडळी येथे मला अधिकारी व्हायचंय या उपक्रमांतर्गत जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून कॅप्टन प्रितीश उत्तम पवार यांनी मुलींना विशेष मार्गदर्शन करतांना स्वत:च्या अनुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. ग्रामीण भागात शिक्षण घेऊन आपण निश्चितच पुढे यशाचे शिखर गाठू शकतो .माझे प्राथमिक शिक्षण जि.प.शाळा सोनांबे येथे झाले.त्यांनतर माध्यमिक शिक्षण जनता विद्यालयात घेतले. प्राथमिक शाळेत असतांना प्रगती केली.जिद्द,मेहनत, महत्वाकांक्षी प्रयत्न या सर्व गोष्टी ठेवून




जाणीवपुर्वक प्रयत्न केले. आई-वडिलांच्या आर्थिक परिस्थितीची जान ठेवा..खडकवासला पुणे येथे प्रशिक्षण घेऊन डेहराडून येथे अधिकचे प्रशिक्षण घेतले नंतर पंजाबमध्ये पोस्टींग झाली.

ध्येय निश्चित केल्यानंतर दुर्दम्य महत्वकांक्षाच्या जोरावर ध्येयापर्यंत पोहचता येते योग्य पद्धतीने अभ्यास केल्यास निश्चितपणे ध्येय गाठता येते लहानपणापासूनचे स्वप्न पूर्ण करता येते अशाप्रकारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रसंगी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे सेक्रेटरी व विद्यालयाचे मुख्याध्यापक एस.बी.देशमुख यांनी उच्च ध्येय व मनात खुणगाठ बांधून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी पालक,गुरुजन यांच्या मार्गदर्शनातून पुढे जावे हा सल्ला दिला. स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी शालेय जीवनात अंगीकारा म्हणजे तुमचे ध्येय गाठून तुम्ही अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण कराल असे सांगितले.

यावेळी बाल विज्ञान विकास शिक्षण प्रसारक संस्थेचे कोषाध्यक्ष व विद्यालयातील उपशिक्षक टी.के.रेवगडे, शालेय समितीचे चेअरमन चंद्रभान रेवगडे, बापू खेलूकर शिक्षक बी.आर. चव्हाण, आर.व्ही.निकम, एस.एम.कोटकर, आर. टी.गिरी, एम.एम.शेख, सविता देशमुख, सी.बी.शिंदे, के.डी.गांगुर्डे, एस.डी. पाटोळे, आर.एस.ढोली, ए.बी.थोरे हे उपस्थित होते. सुत्रसंचलन सविता देशमुख यांनी केले तर आभार आर टी गिरी यांनी मानले.




## बिहार येथिल महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात यावे यासाठी कळंब तहसिलदार यांना निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब : सुधाकर रणदिवे, कळंब तालुक्यातील इटकुर येथिल बौद्ध बांधवांनी दि.८/३/२०२५ रोजी कळंब चे तहसीलदार हेमंत ढोकले यांना निवेदन देण्यात आले. या मध्ये प्रमुख मागणी बिहार येथिल महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्यावे या मागणीसाठी निवेदन देण्यात आले. यावेळी त्रिरत्न बौद्ध महासंघ, परिवर्तन विचार मंच, तुकाराम शिंदे समंत बंधू, अमोल रणदिवे, ग्रामपंचायत सदस्या रेखाताई शिंदे, महानंदा ताई लोंढे, प्रेमकुमार शिंदे, मुकुंद शिंदे, बाळासाहेब ओव्हाळ, भरत गुडे, पल्लवी लोंढे, या वेळी उपस्थित होते.